**डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर**

**राज्यशास्त्र विभाग**

**वृत्तपत्र वाचन उपक्रम अहवाल**

**2024 – 25**

**विभाग: राज्यशास्त्र**

**विभाग प्रमुख व मार्गदर्शक --- डॉ. विद्या चौरपगार**

**उपक्रमाचे नाव : वृत्तपत्र वाचन उपक्रम**

**दिनांक : १६ /१०/ २०२४**

**वेळ: सकाळी ०९.०० ते १०.००**

**जोडलेले संदर्भ -**

**१. छायाचित्र**

राज्यशास्त्र विभागातील बी.ए प्रथम वर्षाचे विद्यार्थी दि. १६.१०.२०२४ रोजी वृत्तपत्र वाचनात मग्न झाले होते. लोकमत, लोकसत्ता, सकाळ, हितवाद, महाराष्ट्र टाईम्स अशा वृत्तापत्रांमधील मजकूर विद्यार्थ्यांनी वाचला. राजकीय, सामाजिक, क्रीडा, मनोरंजन, अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील ताज्या घडामोडींचा आढावा विद्यार्थ्यांनी घेतला.

सध्या महाराष्ट्र राज्याच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे, या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील एकूण मतदार संख्या, स्त्री मतदार संख्या व पुरुष मतदार संख्येची चर्चा केली. वेगवेगळ्या पक्षातून संभाव्य उमेदवार कोण असू शकतात, याबाबतची भाकितेही विद्यार्थ्यांनी केली.

वृत्तपत्र वाचताना प्रसारमाध्यम क्षेत्रातील करिअर याबद्दलही विद्यार्थ्यांनी आपसात चर्चा केली. एकूणच वर्तमान स्थितीला समजण्यासाठी वर्तमानपत्रे हे अतिशय चांगले माध्यम असल्याच्या प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.










**Submitted by --- Dr. Vidhya Chourpagar.**

